# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,
# राष्ट्रीय आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

| | |
|---|---|
| दुरध्वनी – ०२२ – २२७१७५०० <br> फॅक्स – ०२२ – २२६४२९५५ <br> E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com | आरोग्य भवन, ३रा मजला, <br> सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, <br> सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१ |


जा.क्र.राआसो/सीएसआर-धोरण अमंलबजावणी/ /२०२५
१०७८२६-८९५ दि.११/११/२०२५

प्रति,
१.जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व)
२.जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)

**विषय :CSR धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत.**
**संदर्भ : सार्वजनिक आरोग्य विभाग शा.नि. क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र.३६/आरोग्य शिक्षण, (E-१३२६०५६), दिनांक १४ ऑक्टोंबर, २०२५**

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भिय शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे. जिल्हास्तरीय आरोग्य संस्थांकडून सीएसआर निधीचा उपयोग करून आरोग्य सेवांमध्ये आवश्यक पायाभूत सुविधा, उपकरणे, तांत्रिक सुधारणा व सेवा गुणवत्तावाढीच्या दृष्टीने संदर्भाधीन शासन निर्णयाच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करावेत.

**CSR धोरणाची अंमलबजावणी करतांना खालील बाबींचा विशेषत: विचार करावा –**

१. CSR निधीचा उपयोग केवळ शासन निर्णयातील पात्र घटकांसाठीच करावा.
२. प्रकल्पाची उद्दिष्टे, अपेक्षित परिणाम, अंदाजपत्रक व कालबद्ध अंमलबजावणी आराखडा स्पष्ट असावा.
३. सादर केलेला प्रस्ताव संस्था प्रमुख / CSR देणगीदार यांचेकडून प्रमाणित केलेला असावा.

शासन निर्णयातील नमूद केलेले निकष, स्वरूप व प्राधान्य क्षेत्रांनुसार प्रस्ताव तयार करून या कार्यालयाकडे हार्ड कॉपी स्वरूपात व ई-मेल आयडी ( csr.mahahealth@gmail.com ) वर लवकरात लवकर सादर करावेत.

**(डॉ.सुनिता गोल्हाईत)**
**सहसंचालक (तांत्रिक),**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर**
१.मा.आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२.मा.संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई